31 JUL 2003
16735
१११७

क्रमांक : जमीन २६९९ /१४९०/ प्र.क्र.८०२३ /ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- २३ जुलै २००३

**विषय :-** <u>जमीन - मुंबई उपनगर जिल्हा</u>
भूमीगत पाण्याची टाकी बांधण्यासाठी व सुरक्षा कक्ष उभारण्यासाठी मौजे एरंगळ ,ता. बोरिवली, न.भू.क्र. १४३२ या शासकीय जमिनीपैकी जमीन मिळण्याबाबत - डिफेन्स इस्टेट ऑफीस, भारतीय वायुसेना यांची मागणी.

<u>ज्ञापन :-</u>

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी /कार्या ७ अ/जमिन/कावि १०९०/१०००९ दिनांक २२.१२.१०००९ च्या संदर्भात असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, डिफेन्स इस्टेट ऑफीस,भारतीय वायु सेना यांनी एअर फोर्स स्टेशन ,मढ आयलंडसाठी भूमीगत पाण्याची टाकी व सुरक्षा कक्ष उभारण्याकरिता १०९.६८ चौ.मी. जमिनीची मागणी केली असून सदर मागणी शासनाच्या विचाराधीन होती. या संदर्भात शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, भूमीगत पाण्याची टाकी उभारणे हे प्रयोजन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण ) नियम १९७१ च्या नियम ३९ मधील तरतुदीशी मिळतेजुळते प्रयोजन असल्याने एअर फोर्स स्टेशन ,मढ आयलंडसाठी मौजे एरंगळ ,ता. बोरिवली, न.भू.क्र. १४३२ या शासकीय जमिनीपैकी १०९.६८ चौ.मी. शासकीय जमीन भूमीगत पाण्याच्या टाकीसाठी लागणाऱ्या जमिनीकरिता नियम क्रमांक-३९ मधील तरतुदीनुसार जमिनीच्या बाजारमुल्याच्या ५% इतके वार्षिक अधिमुल्य आकारुन व सदर जमिनीपैकी सुरक्षा कक्ष उभारण्यास लागणारी जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण ) नियम १९७१ च्या नियम ३५ मधील तरतुदीनुसार प्रचलित बाजारभावानुसार येणा-या जमिनीच्या किमतीवर प्राईम लेंडींगरेटप्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने मंजूर करण्यास नेहमीच्या अटी व शर्ती आणि जिल्हाधिका-यांना योग्य वाटतील अशा अटी व शर्तीवर मंजूर करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने व शासन ठराव, वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०९२/प्र.क्र. १४८/१२ विनिमय, दिनांक १.८.१९९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शिवाजी पाटणकर)
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

सोबत : १ संचिका

प्रति,

जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे(पूर्व), . मुंबई ४०० ०५१.

ORDER % J-3.hwp C:\WINDOWS\Desktop\Rokade\LETTER 335

# जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पु) मुंबई-५१

दुरध्वनी : ६५५६७९९, ६५५०९९९ फॅक्स : ६५५६६०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्रमांक : सी/कार्या-३डी/एल- 692 /२००३
दिनांक : 16 /०९/२००३

संदर्भ :- १) महसूल व वनविभाग, शासन ज्ञापन क्र. जमीन-२६९९/१४९०/प्र.क्र.८०२३/ज-३ दि. २३/७/२००३

**आदेश**

डिफेन्स इस्टेट ऑफीस , भारतीय वायू सेना यांना एअर फोर्स स्टेशन मढ आयलंडसाठी भूमीगत पाण्याची टाकी व सुरक्षा कक्ष उभारण्यासाठी महाराष्ट्र जमिन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ चे नियम ३९ मधील तरतुदीनुसार मौजे - एरंगळ, ता. बोरीवली, न.भू.क्र. १४३२ या शासकीय जमिनीपैकी १०९.६८ चौ.मी. शासकीय जमीन , भूमीगत पाण्याची टाकी साठी लागणाऱ्या जमिनीकरीता नियम क्रमांक ३९ मधील तरतुदीनुसार जमिनीच्या बाजारमुल्याच्या ५% इतके वार्षिक अधिमुल्य आकारुन व सदर जमिनीपैकी सुरक्षा कक्ष उभारण्यास लागणारी जमीन महाराष्ट्र जमिन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ३५ मधील तरतुदीनुसार प्रचलित बाजारभावानुसार येणाऱ्या जमिनीच्या किमतीवर " प्राईम लेंडींग रेट" प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने अटी/शर्तीवर मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासनाने मंजूर केलेल्या १०९.६८ चौ.मी. जमिनीपैकी पाण्याच्या टाकीसाठी नेमकी किती ? व सुरक्षा कक्षासाठी नेमकी किती जमीन लागणार आहे? याबाबत प्रत्यक्ष मोजणी करुन अहवाल पाठविणेस नगर भूमापन अधिकारी यांना कळविणेत आले होते. नगर भूमापन अधिकारी यांनी डिफेन्स इस्टेट ऑफीस, भारतीय वायूसेना यांचे प्रतिनिधी यांनी प्रत्यक्षात दाखविलेल्या जागेप्रमाणे मोजणी करुन मोजणी अहवाल नकाशाच्या प्रतिसह दि. २९/८/२००३ अन्वये सादर केला असून त्यांचे मोजणी अहवालाप्रमाणे पुढील प्रमाणे क्षेत्राची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

| | |
|---|---|
| पंप हाऊस | ६८.०० चौ.मी. |
| सुरक्षा कक्ष | ४१.०० चौ.मी. |
| | १०९.०० |
| पाण्याची टाकी + | १७६.७० चौ.मी. |
| **एकूण क्षेत्र :-** | २८५.७० चौ.मी. |

वरीलप्रमाणे पंप हाऊस व सुरक्षा कक्षासाठी १०९.०० चौ.मी. व भूमीगत पाण्याच्या टाकीसाठी १७६.७० चौ.मी. क्षेत्राची डिफेन्स इस्टेट ऑफीस , भारतीय वायुसेना , मढ आयलंड यांना आवश्यकता असल्याने भूमीगत पाण्याची टाकी उभारणेसाठी महाराष्ट्र जमिन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ३९ मधील तरतुदीनुसार मौजे एरंगळ , ता. बोरीवली , न.भू.क्र. १४३२ पैकी १७६.७० चौ.मी. जमीन, जमिनीच्या बाजारमुल्याच्या ५% इतके वार्षिक अधिमुल्य आकारुन व पंप हाऊस व सुरक्षा कक्ष उभारण्यास लागणारी १०९ चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमिन महसूल ( सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ च्या नियम ३५ मधील तरतुदीनुसार प्रचलित बाजारभावानुसार येणाऱ्या जमिनीच्या किमतीवर प्राईम लेंडींग रेट प्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारुन ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने शासनाचे अंतिम मंजूरीस अधिन राहून खालील अटी व शर्तीवर मंजूर करणेत येत आहे.

भूमीगत पाण्याच्या टाकीसाठी वापरण्यांत येणाऱ्या १७६.७० चौ.मी. जमिनीचे सिध्दगणकाप्रमाणे तात्पुरते बाजारमूल्य प्रति चौ.मी. ला रु. ४८५०/- इतके मानून या दराप्रमाणे जमिनीचे बाजारमूल्य ८,५६,९९५/- इतके होत असून त्यावर ५% अधिमुल्य आकारुन वार्षिक भाडेपट्टयाची रक्कम ४२,८५०/- इतकी होत आहे.

तसेच पंप हाऊस व सुरक्षा कक्ष उभारण्यास लागणाऱ्या १०९ चौ.मी. जमिनीची सिध्दगणकाप्रमाणे प्रचलित बाजारभावानुसार तात्पुरती बाजारभावाची किंमत प्रति चौ.मी. ४८५०/- इतकी मानून या दराप्रमाणे जमिनीची



Scanned by CamScanner

बाजारभावाची तात्पुरती किंमत रु. ५,२८,६५०/- इतकी होत असून त्यावर १ जानेवारी २००३ रोजीच्या १०.७५% इतक्या प्राईम लेंडींग रेट" प्रमाणे भाडेपट्ट्याची रक्कम रु. ५६,८३०/- इतकी होत आहे. डिफेन्स इस्टेट ऑफीस , भारतीय वायू सेना सह आयुक्त यांनी कळविल्याप्रमाणे वार्षिक अधिमूल्याची रु.रु. ४२,८५० व भाडेपट्ट्याची रक्कम रु. ५६,८३०/- अशी एकूण रक्कम रु. ९९,६८०/- हा आदेश प्राप्त झालेपासून १० दिवसांत तहसिलदार बोरीवली यांचे कार्यालयात जमा करावी.

पुढील कालावधीसाठी भूमीगत पाण्याची टाकी उभारणेसाठी लागणाऱ्या जमिनीचा तात्पुरता वार्षिक भाडेपट्टा रु. ४२,८५०/- इतका राहील तसेच पंपहाऊस व सुरक्षा कक्ष उभारण्यास लागणाऱ्या जमिनीची पुढील कालावधीची भाडेपट्ट्याची गणना , तहसिलदार बोरीवली यांनी प्रचलित बाजारभावाची तात्पुरती किंमत रु. ५,२८,६५०/- या रक्कमेवर प्रतिवर्षीचे १ जानेवारी रोजी असणाऱ्या " प्राईम लेंडींग रेट" प्रमाणे करून वसूल करणेची आहे.

**अटी व शर्ती :-**

१) मंजूर जमिनीची आजच्या बाजारभावाची किंमत सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्य निर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत करून घेतल्यानंतर तात्पुरत्या किंमतीपेक्षा अंतिम किंमत अधिक असल्यास फरकाची रक्कम प्रचलित व्याजदराने व्याजासह शासन /जिल्हाधिकारी यांचेकडे पट्टेदारास भरणा करावी लागेल.

२) पट्टेदार यांना जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे त्या प्रयोजनासाठीच जमिनीचा वापर करावा लागेल . वापरात बदल करावयाचा असल्यास शासन /जिल्हाधिकारी यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील

३) शासन/जिल्हाधिकारी यांच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणताही जमीन किंवा तीचा कोणताही भाग किंवा तिच्यावरील कोणतेही हितसंबंध हस्तांतरीत करता येणार नाहीत.

४) मुंबई महानगर पालिकेचे हैड्रोलीक ईंजिनिअर यांचे पत्र क्र. HE/७६/SR दि. ८/७/१९९९ मधील अट क्र. २ नुसार पाण्याच्या टाकीचे बांधकाम / उभारणी करणेत यावी.

५) सदर जमिन शासनाचे अंतिम मंजूरीस अधिन राहून मंजूर करणेत येत आहे. शासनाने मंजूरी नाकारल्यास जमीन विनामोबदला पुर्नग्रहीत करण्यांत येईल किंवा शासन अंतिम मंजूरी आदेशात लादेल त्या अतिरिक्त अटी/शर्ती पट्टेदारास बंधनकारक राहतील.

६) प्रश्नाधिन जमीन पट्टेदार भोगवटादार वर्ग-२ म्हणून धारण करतील.

७) भाडेपट्ट्याची मुदत संपण्यापूर्वी ३ महिने आगोदर पट्टेदाराने त्याची इच्छा असल्यास नवीकरण करण्याबाबत लेखी अर्ज जिल्हाधिकाऱ्यांकडे केला पाहिजे. पट्टेदाराने नवीकरणाबाबत लेखी अर्ज न केल्यास भाडेपट्ट्याची मुदत संपल्यानंतर त्यास नवीकरणाची आवश्यकता नाही असे मानून भाडेपट्टा संपुष्टात आणला जाईल.

८) प्रति १० वर्षांनी भाडेपट्ट्याच्या दराचे पुर्नविलोकन ( सुधारणा ) करण्यांत येईल व त्यानुसार होणारी भाडेपट्ट्याची रक्कम भरणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

९) बांधकाम नकाशे बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून मंजूर करुन घ्यावेत व बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली नुसार बांधकाम करावे.

१०) पट्टेदार यांनी दोन वर्षाच्या आंत बांधकाम पूर्ण करुन जमिनीचा वापर ज्या प्रयोजनार्थ जमीन मंजूर केली आहे. त्या प्रयोजनार्थ चालू करावा.

११) जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेल्या शासकीय अधिकारी /कर्मचारी यांना केंव्हाही जमिनीच्या उक्त भागात प्रवेश करुन निरिक्षण करण्यास परवानगी देणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१२) मंजूर जमिनीव्यतिरिक्त सरकारी जमिनीतून , तीवरुन किंवा ती खालून पाण्याचे प्रमुख नळ, नळ घालण्यास शासन/जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१३) जमिनीवरील खनिज व गौण खनिजाचे हक्क शासनाचे राहतील.

१४) प्रति १०० चौ.मी. ला एक या प्रमाणे झाडे लावणे व त्यांची जोपासना करणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१५) भाडेपट्टेदार यांनी प्रतिवर्षाची भाडेपट्ट्याची रक्कम प्रतिवर्षाचे १ ऑगस्ट रोजी भरावी.

१६) भाडेपट्ट्याची गणना करणेत कोणतीही चूक झाल्याचे अथवा कमी आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे भाडेपट्ट्याची सुधारीत आकारणी करणेत येईल व सुधारीत आकारणीप्रमाणे रक्कम भरणे पट्टेदारास बंधनकारक राहील.

१७) पट्टेदार यांना शासनाबरोबर करारनामा करावा लागेल व त्यासाठी होणारी शासकीय फी भरणे पट्टेदारास बंधनकारक राहील.



Scanned by CamScanner

१८) हया पट्टयाच्या शर्तीपैकी कोणत्याही शर्तीचा भंग झाल्याच्या बाबतीत , पट्टेदार अधिनियमांत व त्या अन्वये केलेल्या नियमात तरतूद केल्याप्रमाणे शास्तीस पात्र राहील.

१९) उक्त अधिनियमाचे उपबंध व त्यावेळी अंमलात असणारे सर्व नियम व आदेश त्यांचे उपबंध जेथवर लागू असतील तेथवर ते उक्त जमिनीच्या माझ्या भोगवटयास लागू असतील.

२०) उपरोक्त अटी/शर्ती मान्य असल्याबाबतचे हमीपत्र रु.१००/- चे मुद्रांकित पेपरवर सादर करावे.

जिल्हाधिकारी ५/९/०८

मुंबई उपनगर जिल्हा करिता

मूळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

प्रति,

डिफेन्स इस्टेट ऑफीस,

भारतीय वायू सेना,

एअरफोर्स स्टेशन, मढ आयलंड,

मुंबई ४०० ०६१

प्रतिलिपी:-

१) मा. प्रधानसचिव ( महसूल) महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांचेकडेस महसूल व वनविभाग, शासन ज्ञापन क्र. २६९९/१४९०/प्र.क्र. ८०२३/ज-३ दि. २३/७/२००३ च्या अनुषंगाने कार्योत्तर मंजूरीसाठी सविनय सादर.

२) तहसिलदार बोरीवली / नगर भूमापन अधिकारी , गोरेगांव यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

२/- त्यांनी गांवच्या भूमी अभिलेखामध्ये योग्य त्या नोंदी घेवून अद्ययावत केलेल्या अभिलेखाच्या प्रती या कार्यालयास सादर कराव्यात. नगर भूमापन अधिकारी यांनी पट्टेदाराने हमीपत्र सादर केल्याची खात्री करुन जमिनीचा रितसर ताबा संबंधितांस देऊन ताबा पावती व नकाशाच्या तीन प्रतीसह अहवाल या कार्यालयास सादर करावा.

३) अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी रवाना.

४) उपविभागीय अधिकारी , मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडे माहितीसाठी रवाना.

जिल्हाधिकारी ५/९/०८

मुंबई उपनगर जिल्हा करिता

मूळप्रतीवर जिल्हाधिकारी यांची सही असे

Received one copy (Kumar L) SSt 16/9

ESS 16/9/03

Scanned by CamScanner

क्रमांक : जमीन २५९९/१४९०/प्र.क्र.८०२३/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई - ३२
दिनांक :- ११-१०-२००४

विषय :- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे एरंगळ, ता. बोरिवली, स.भू.क्र. १४३२ मधील सुधारीत क्षेत्र
डिफेन्स इस्टेट ऑफिस, भारतीय वायुसेना यांना भूमीगत
पाण्याची टाकी बांधण्यासाठी व सुरक्षा कक्ष उभारण्यासाठी
मंजूर करणेबाबतच्या जिल्हाधिकारी यांच्या आदेशास कार्योत्तर मंजूरी देण्याबाबत

वाचा :- शासन ज्ञापन समक्रमांक दि २३ जून २००२

ज्ञापन :-

आयुक्त, कोकण विभाग यांना त्यांचे त्यांचे पत्र क्रमांक-मशा /कार्या २ /जमिन-१ /कावि ८/०४ दिनांक ६.७.२००४ व जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना त्यांचे पत्र क्रमांक-सी /कार्या ३ डी /एल ५१९ दि. २९.१२.२००३ च्या संदर्भात असे कळविण्याचे मला निदेश आहेत की, डिफेन्स इस्टेट ऑफिस,भारतीय वायु सेना यांना एअर फोर्स स्टेशन ,मढ आयलंडसाठी भूमीगत पाण्याची टाकी व सुरक्षा कक्ष उभारण्याकरीता १०९.६८ चौ.मी. जमीन संदर्भाधीन शासन ज्ञापनान्वये मंजूर करण्यात आली आहे. परंतु प्रत्यक्ष मोजणीअंती डिफेन्स इस्टेट ऑफिस, भारतीय वायु सेना, एअर फोर्स स्टेशन, मढ आयलंड यांना पहारा व सुरक्षा कक्षासाठी १०९.०० चौ.मी. व भूमीगत पाण्याच्या टाकीसाठी १७६.७० चौ.मी. क्षेत्राची आवश्यकता असल्याचे स्पष्ट झाले असल्याने जिल्हाधिकारी यांनी दि.१६.९.२००३ च्या आदेशान्वये भूमीगत पाण्याची टाकी उभारण्यासाठी महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील नियम ३१ मधील तरतुदीनुसार मौजे एरंगळ येथील १७६.७० चौ.मी. जमीन चालू बाजारमूल्याच्या ५ टक्के इतके वार्षिक अधिमूल्य आकारून व पहारा कक्ष आणि सुरक्षा कक्षासाठी लागणारी १०९ चौ.मी. जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट) नियम, १९७१ मधील नियम ३५ मधील तरतुदीनुसार प्रचलित धोरणाप्रमाणे येणा-या जमिनीच्या किंमतीवर प्राईमलेंडींग रेटप्रमाणे प्रतिवर्षी भाडे आकारून ३० वर्षांच्या भाडेपट्ट्याने शासनाच्या अंतिम मंजूरीस अधिन राहून मंजूर केली आहे. जिल्हाधिकारी यांच्या दिनांक १६.९.२००३ च्या आदेशास याद्वारे शासनाची कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर ज्ञापन शासन आदेश, वित्त विभाग क्रमांक विअप्र-१०९२/प्र.क्र. १४८/९२ विनियम, दिनांक १.८.१९९२ अन्वये या विभागास प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(शिवाजी पाटणकर)
अवर सचिव
महसूल व वन विभाग.

प्रति,
जिल्हाधिकारी,मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत,
वांद्रे पूर्व, मुंबई ४०० ०५१.

21 OCT 2004

Scanned by CamScanner

# नगर भूमापन अधिकारी, गोरेगांव यांचे कार्यालय

बेस्ट कॉलनी, अधिकारी वसाहत, दादासाहेब रुपवते मार्ग, गोरेगांव (प) मुंबई-४००१०४

क्र. न.भू.अ.गो./न.भू.एरंगळ/न.भू.क्र.१४३२/२०१२/ ३७२
गोरेगांव दिनांक : २८/२/२०१२

प्रति,

मा. उपजिल्हाधिकारी (सा.प्र)
मुंबई उपनगर जिल्हा

**विषय :-** जमिन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे - एरंगळ येथील न.भू.क्र. १४३२ मधील २८५.७० चौ.मी. भूमिगत पाण्याची टाकी व सुरक्षा कक्ष बांधण्यास भाडेपट्टयाने मंजूर केलेल्या जमिनी बाबत

**संदर्भ :-** १) आपले कडील पत्र क्र. सी/कार्या.३डी/एल.६१९ दि.२३/३/२०११
२) आपले कडील पत्र क्र. सी/कार्या.३डी/एल.६१९ दि.२०/६/२०११
३) इकडील पत्र क्र. न.भू.अ.गोरेगांव/न.भू.एरंगळ/प.भू.४/बा.क्र.८१/२०११ दिनांक २८/६/२०११
४) आपले कडील पत्र क्र. सी/कार्या-३डी/एल-६१९ दिनांक २५/७/२०११

उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये विषयांकित कामी मागणी केलेल्या पत्रनुसार खालील प्रमाणे अहवाल सादर करणेत येत आहे.

नगर भूमापन एरंगळ, ता. बोरीवली येथील न.भू.क्र. १४३२ या जागेची मा. तहसिलदार, बोरीवली या कार्यालयातील प्रतिनिधी यांचे समवेत पहाणी केली असता जागेवर सुरक्षा कक्ष व भूमिगत पाण्याची टाकी हयाबाबतचे कोणतेही बांधकाम आढळून आलेले नाही.

मा. जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचेकडील पत्र क्रमांक सी/कार्या-३डी/कावि-१४०/२००३, दिनांक २७/८/२००३ अन्वये इकडील पत्र क्र. न.भू.एरंगळ/१४३२/प.भू.४/२००३ गोरेगांव दिनांक २९/८/२००३ चे पत्रासोबत विषयांकित जागेचा नकाशा भारतीय वायूसेना यांचेकडील प्रतिनिधी यांनी दाखविलेल्या जागेप्रमाणे तयार करुन सादर करणेत आलेला आहे.

तसेच इकडील अभिलेख पहाता नगर भूमापन एरंगळ ता. बोरीवली न.भू.क्र १४३२ मधील २८५.७० चौ.मी. क्षेत्राचा ताबा या कार्यालयाकडून मे. डिफेन्स इस्टेट ऑफिस भारतीय वायूसेना यांना देण्यात आलेला नाही. सोबत मिळकत पत्रिकेची सत्यप्रत सादर केली असे. तरी नियमानुसार पुढिल कार्यवाहीबाबत आदेश होणेस विनंती आहे.

04 MAR 2012
६०२६

नगर भूमापन अधिकारी,
गोरेगांव २८/२/१२